ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2021- Vol. 10 No. 2

# आदिवासी आर्थिक समस्या आणि विकास:चिकित्सक अध्ययन

**भाग्यश्री स. होले**
*संशोधक विद्यार्थी*
*पीपल्स कॉलेज नांदेड*

***सारांश:-***
*ब्रिटिश कालखंडामध्ये आदिवासीच्या एकंदरीत विकासाकडे किंवा त्यांच्या समस्यांकडे ब्रिटिश शासनाचे लक्ष नव्हते जोपर्यंत आदिवासी भागात एखादी चळवळ, उठाव किंवा शांतता सुरक्षिततेचा प्रश्न होत नाही तोपर्यंत त्यांच्याकडे प्रशासनाचे लक्ष जात नव्हते त्यांच्या समस्या सुटाव्यात किंवा त्याचा विकास व्हावा असे त्यावेळी वाटत नव्हते आणि आजही "निसर्गाच्या राज्यात" आदिवासी जगत आहे. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा वंचित, मागास समुदायाच्या बाबतीतील दृष्टिकोन "भारतातल्या राष्ट्रीय जीवनातल्या मुख्य प्रवाही संस्कृतीत आदिवासींना हळूहळू सामावून घेणे व त्यांच्यात वैचारिक परिवर्तनाची प्रक्रिया घडवून आणून मुख्य प्रवाहात आणणे" असा होता. आदिवासी समाजाने स्वयंस्फूर्तीने नवीन परिवर्तने स्वीकारावीत कोणी आपल्यावर लादतय म्हणून नव्हे तर ते स्वतःच्या समुदायाच्या हिताकरिता स्वीकार करणे अपेक्षित आहे. आदिवासी त्यांच्या स्वतःच्या पात्रता सिद्ध करून पुढे येतो आहे व आधुनिक जीवनाचे लाभ मिळवून स्वतःचा आर्थिक विकास साधतो आहे.*

***मुख्य शब्द** :-*
*आदिवासी, आर्थिक समस्या, विकास योजना.*

**प्रस्तावना** :-
आज संपूर्ण जगात सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक आणि पर्यावरणीय बदल जलद गतीने घडून येत आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात बदलाची गती अतिशय वेगवान झाल्याने विकास प्रक्रिया गतिमान बनलेली असून जगातील सर्व देश आपल्या विकासाबाबत जागृत होत आहेत या वेगवान विकास प्रक्रियेमध्ये जगभरातील त्या-त्या विभागात आदिम काळापासून वास्तव करणाऱ्या आदिवासी जमाती आपल्या अस्तित्वासाठी जीवन संघर्षाने लढता आहेत. पराकोटीचे दारिद्र्य, निरक्षरता, कुपोषण, उपासमार, गुलामगिरी व वेठबिगारी यासारख्या समस्यांनी हा आदिवासी समाज जखडलेला आहे. आदिवासी (Tribes) या शब्दाचा अर्थ 'जमात' किंवा 'जमाती' आहे आधीपासून किंवा सुरुवातीपासून दऱ्याखोऱ्या मध्ये जंगलामध्ये जे लोक निवास करतात त्याला आपण आदिवासी म्हणतो. नगरांपासून अलिप्त राहणारे वनांमध्ये राहणाऱ्या विविध आदिवासी जमाती आहेत तर काही आदिवासी जमाती या स्थानिक सुद्धा झालेल्या आहेत आपल्या महाराष्ट्र राज्यात सह्याद्री विभाग, सातपुडा विभाग आणि गोंडवाना विभाग अशा तीन भौगोलिक पट्ट्यात आदिवासी आहेत.

| **सह्याद्री विभाग** | |
|---|---|
| ठाणे, नाशिक, पुणे, अहमदनगर, रायगड इत्यादी. जिल्हे | महादेव कोळी, वारली कातकरी, कोकण, ठाकर, ढोर कोळी, मल्हार कोळी, पाथोडी |
| **सातपुडा विभाग** | |
| धुळे, जळगाव, अमरावती, औरंगाबाद इत्यादी. जिल्हे. | भिल्ल, गावित, धनका, पावरा, हुबळा, पारधी, कोलाम, तडवी, मावची कोरकू |
| **गोंडवाना विभाग** | |
| गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, नागपूर, नांदेड, यवतमाळ | गोंड, माडिया गोंड, कोलाम, परधान, आंध किया, कोरळी, हलवा, कारव |

स्त्रोत - महाराष्ट्रातील सामाजिक-राजकीय चळवळी व प्रशासन

भारतीय राज्यघटनेच्या 366 (25) या कलमान्वये आदिवासीना अनुसूचित जमाती ही संज्ञा वापरली जाते. 2011 च्या जनगणनेनुसार आदिवासीची संख्या 85,77,276 राज्याच्या (8.9% ) आहे. भारतात 747 आदिवासी जमाती आहेत आणी महाराष्ट्रात 47 जमाती आहे. महाराष्ट्रात 10 मोठे आदिवासी गट आहेत. महाराष्ट्र राज्याचा आदिवासी लोकसंख्येबाबत पाचवा क्रमांक लागतो. आदिवासींना विकासाच्या मुख्य प्रवाहात मध्ये सामील करून घेण्याच्या दृष्टीने शासकीय पातळीवरून प्रयत्न सुरू झाले आहेत. परिवर्तनाची चाहूल लागलेली आहे पण समस्या अजूनही कमी झालेल्या नाही, त्या अजूनही तशाच आहेत.

वरील संशोधन लेखातील विषयाच्या अनुषंगाने संशोधनाची काही उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत- आदिवासीच्या राहणीमानाचा दर्जा सुधारणे, आदिवासींना भेडसावणाऱ्या महत्वाच्या समस्यांची सोडवणूक करणे आणि त्याची पिळवणूक थांबवणे, त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासाची गती वाढवणे, राज्यात आदिवासी विकासाकरता राबविण्यात येणाऱ्या आर्थिक योजना वयात या योजने अंतर्गत होणाऱ्या खर्चाचा रास्त हिस्सा आदिवासी क्षेत्राला व आदिवासींच्या विकासासाठी

खर्च व्हायला हवा आदिवासी क्षेत्र आणि इतर क्षेत्र यामधील अंतर दूर करणे या उद्दिष्टाच्या साह्याने सदर शोधनिबंधाची चिकित्सा करण्यात आली आहे.

**आदिवासी समाजाचे अर्थार्जन :-**

साधारणपणे असे म्हटले जाते मानवाला पोट नसते तर माणूस आळशी झाला असता भूक ही प्रत्येक मानवाची प्राथमिक गरज आहे आणि ती भागवण्यासाठी प्रत्येक व्यक्ती हा धडपडतो त्याकरिता विविध आर्थिक क्रिया त्याला करा व्या लागतात आदिवासीच्या उपजीविकेची साधने सारखी नाही त्यामुळे त्याच्या आर्थिक जीवन सारखे नाही निसर्गातील उपलब्ध साधनांचे संकलन करणे. कंदमुळे, फळे, पाने, फुले, डिंक, वनस्पतिजन्य पदार्थ, मत कीटक, प्राणी यांचा समावेश आदिवासी अन्नसंकुलना मध्ये करतात. त्याचबरोबर शिकार करणे. आदिवासींच्या आर्थिक जीवनात शिकारीला विशेष महत्त्व आहे शिकारी बरोबरच पशुपालन कुकुटपालन यांचा अंतर्भाव करण्यात येतो. शेती अर्थव्यवस्थेत पासून मानवाच्या प्रगतीला सुरुवात झाली भारतातील बहुसंख्य आदिवासी व शेती व्यवसायावर अवलंबून आहेत त्याच बरोबर हस्तव्यवसाय औषधी वनस्पती गोळा करणे, विणकाम करणे, मातीची भांडी बनवणे, बांबूपासून टोपल्या चटया बनवणे व त्या विकणे अशा प्रकारे आदिवासी समाजाचे अर्थार्जन हे सुरू आहे व यातून काही समस्या निर्माण झाल्या आहेत. आदिवासी समाजाचे लोक फक्त जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन घेताना दिसतात कारण मोठ्या प्रमाणात उत्पादन घेण्याकरिता त्यांच्याजवळ पैशांचा अभाव आहे बँका, पतपेढ्या यांची माहिती त्यांना नसते हे लोक फक्त उपभोग्य वस्तूंचे उत्पादन घेत असल्यामुळे बाजारपेठ स्पर्धा एकाधिकार यांचा अभाव आपल्याला दिसून येतो. आपल्या मालाला बाजारातील किंमत काय आहे किंवा त्याचे औषधी गुणधर्म काय आहे त्याला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर किती मागणी आहे याची जाणीव त्यांना नसल्यामुळे त्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. समाज आजही अप्रगत अवस्थेत असल्यामुळे शिक्षणाचा अभाव आहे त्यामुळे नवनवीन शोध आधुनिक शेती याची माहिती नाही या समाजाच्या आर्थिक जीवनावर धर्म व जादू चा मोठा पगडा असल्यामुळे त्यांचे जीवन आधुनिक जीवनापासून वेगळे आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

आदिवासी विकासाकरता राबवण्यात येत असलेल्या आरोग्यविषयक, शिक्षण विषयक, आर्थिक, सामाजिक सांस्कृतिक योजना आहेत त्यापैकी आदिवासीं करिता च्या आर्थिक उन्नतीच्या योजना पुढील प्रमाणे-

१. आदिवासी शेतकऱ्यांना वीज पंप / तेल पंप पुरवठा करणे.
२. केंद्रीय अर्थसंकल्प नियर (न्यूक्लियर बजेट)
३. व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना
४. स्वयंरोजगारासाठी कर्ज पुरवठा योजना शबरी वित्त व विकास महामंडळ मर्यादित
५. खावटी कर्ज योजना
६. धान्यकोष योजना
७. आदिम जमातीसाठी विकासाच्या योजना केंद्रीय सहाय्य

स्त्रोत - आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र शासन भारत

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत लघुशोधनिबंधाच्या लेखनासाठी प्राथमिक सामग्रीतून निरीक्षण तंत्राचा व द्वितीयक सामग्रीतून संदर्भ ग्रंथ, मासिके, इंटरनेट या स्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

**निष्कर्ष –**

आदिवासी समाजाच्या विकासासाठी सरकार विविध योजना आखत असते सध्या सरकारची सुरू असलेली जनधन योजना असेल किंवा आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना असेल पण या योजनांचा लाभ त्यांना मिळत नाही त्यांना त्यांच्या भावाची रास्त किंमत मिळवून देण्याकरिता आपण समोर येऊन प्रयत्न करायला हवेत सध्या शिक्षण क्षेत्रात काही आदिवासी लोक प्रगती करीत आहेत त्यांनी आपल्या त्यांनी आपल्या समाज बांधवांच्या विकासाकरिता प्रयत्न करायला हवेत आदिवासी समाजाला विकासाच्या प्रवाहात मध्ये सामावून घेणे ही काळाची गरज आहे.

- आदिवासी समाजाची वस्ती दुर्गम अशा रानावनात पर्वतात दऱ्याखोऱ्यात असते.
- आदिवासी समाजाची अर्थव्यवस्था अतिमागास असून ते शिकार जंगलतोड फिरती शेती यावर निर्वाह करतात.
- आदिवासी जीवन एकांतवासी असल्यामुळे बाह्य जगाशी संपर्क कमी येतो.
- सामाजिक सांस्कृतिक संस्थांना बाधा न आणता विकासाची कामे व्हायला हवीत.
- आदिवासींना लागणारा कर्जपुरवठा सहकारी पद्धतीने करणे व त्यासाठी सहकारी संस्थांचे जाळे पसरून त्याद्वारे पतपुरवठा करणे आदिवासींच्या शेतमालाला योग्य भाव मिळवून देऊन त्यांच्या दैनंदिन गरजा भागवणे.
- आदिवासींच्या आर्थिक विकासाकरिता असलेल्या विविध योजनांचा लाभ त्यांना मिळवण्याकरता शासन स्तरावरून प्रयत्न होतात पण ते लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचताच असे नाही.

- आदिवासी लोकांचा जीवनस्तर उंचावण्याकरता प्रत्यक्ष विकास कार्यक्रमांना प्रोत्साहन दिल्यास आर्थिक विकास साध्य होण्यास मदत होते.

**संदर्भसूची-**

१. *आदिवासी विकास प्रशासन, डॉक्टर एस. जी. देवणगावकर (2011) श्री साईनाथ प्रकाशन धरमपेठ नागपूर पृष्ठ क्रमांक 51, 57*

२. *सामाजिक राजकीय चळवळी व प्रशासन डॉक्टर शुभांगी दिनेश राठी अथर्व पब्लिकेशन्स पृष्ठ क्रमांक 63, 64, 73*

३. *योजना- आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र शासन भारत आदिवासी विकास योजना - संदर्भ प्रकाशन*

४. *योजना मासिके केंद्रीय सदन नवीन मुंबई*

५. *Tribal economic problem and prospectus - Ram mani chugh Publication 1988 Andhra Pradesh*

६. *tribal and Indian society Sunil Kumar(2011) ABD Publishes Jaipur- Rajasthan*